**<u>नामनिर्देशनाने नियुक्ती.</u>**

**प्राध्यापक, शासकीय महाविद्यालये/संस्था, महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-अ.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: नियुक्ती-२०२६/प्र.क्र.२१/ई-१६२७८८२/मशि-१**
मंत्रालय विस्तार, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १४ ऑक्टोबर, २०२६.

**<u>वाचा :-</u>**

१. शासनपत्र क्र. संकीर्ण-२०२२/प्र.क्र.१८६/मशि-१, दि.१३.०४.२०२३ व दि.२०.०८.२०२४.
२. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे पत्र क्र. एचटीआर-०९२२/प्र.क्र.१८६/२०२२/२९, दि.२७.०३.२०२६.

**शासन निर्णय :-**

उच्च व तंत्र शिक्षण विभागाने संदर्भाधीन क्र.१ येथील पत्रान्वये सादर केलेल्या मागणीपत्रानुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून प्राध्यापक, महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-अ या संवर्गातील ३२ पदांसाठी जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्यानुसार आयोगाने पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेऊन संदर्भ क्र. २ येथील दि.२७ मार्च,२०२६ रोजीच्या पत्रान्वये प्राध्यापक, गट-अ संवर्गातील पदांवर नियुक्तीसाठी उमेदवारांची शासनास शिफारस केली आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या खालील तक्त्यात नमूद उमेदवारांना प्राध्यापक, शासकीय महाविद्यालये/संस्था, महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-अ या पदावर, त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या प्रवर्गात व पदस्थापनेच्या कार्यालयात ते प्रत्यक्ष ज्या दिनांकापासून रूजू होतील त्या दिनांकापासून दोन वर्षाच्या परिविक्षा कालावधीसाठी निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात नामनिर्देशनाने नियुक्ती व पदस्थापना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | उमेदवाराचे नाव | विषय | मूळ प्रवर्ग | नियुक्तीचा प्रवर्ग | पदस्थापनेचा तपशील |
|---|---|---|---|---|---|
| १. | श्रीम. दिपाली पुंडलिकराव गुलवाडे | रसायनशास्त्र | इ.मा.व. (महिला) | खुला (महिला-१) | शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २. | श्री. उमेश उत्तमराव जाधव | जैवतंत्रज्ञान | खुला | खुला (सर्वसाधारण-१) | शासकीय विज्ञान संस्था, छ. संभाजीनगर |
| ३. | श्री. अनिकेतकुमार कृष्णराव गादे | जीवशास्त्र | भ.ज. (क) | खुला (सर्वसाधारण-२) | शासकीय न्यायसहाय्यक विज्ञान संस्था, नागपूर |
| ४. | श्री. विश्वंभर सुकलाल पाटील | गणित | खुला | खुला (सर्वसाधारण-३) | शासकीय विज्ञान संस्था, मुंबई |
| ५. | श्री. प्रविण सोपानराव वाळके | भौतिकशास्त्र | खुला | (Against Divyang Gr-A) खुला (सर्वसाधारण-४) | शासकीय विज्ञान संस्था, मुंबई |
| ६. | श्री. मनोज लेखक | वनस्पतीशास्त्र | खुला | (Against EWS) (सर्वसाधारण-१) | शासकीय विज्ञान संस्था, मुंबई |
| ७. | श्रीम. प्रज्ञाशैली भगवान सवाई | इंग्रजी | अ.जा. (महिला) | खुला (महिला-२) | शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती |
| ८. | श्री. जगदिश छबुराव सोनवणे | इतिहास | अ.जा. | अ.जा. (सर्वसाधारण-१) | शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती |
| ९. | श्री. राजू मदन बेलेकर | भौतिकशास्त्र | अ.जा. | अ.जा. (सर्वसाधारण-२) | शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती |
| १०. | श्री. सावळीराम गोगा घाणे | वनस्पतीशास्त्र | अ.ज. | अ.ज. (सर्वसाधारण-१) | शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती |
| ११. | श्री. चरणसिंग नथुसिंग कायटे | संगणकशास्त्र | वि.जा. (अ) | वि.जा. (अ) (सर्वसाधारण-१) | शासकीय न्यायसहाय्यक विज्ञान संस्था, मुंबई |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १२. | श्रीम. शोभा कमलाकर बाविस्कर | संगणकशास्त्र | अ.जा. (महिला) | (Against EWS) (महिला -१) | शासकीय न्यायसहाय्यक विज्ञान संस्था, छ. संभाजीनगर |
| १३. | श्रीम. वंदना मोहनराव कांबळे | रसायनशास्त्र | अ.जा. (महिला) | अ.जा. (महिला -१) | शासकीय विज्ञान संस्था, मुंबई |
| १४. | श्री. तुकाराम गोविंद ठाणगे | गणित | इ.मा.व. | इ.मा.व. (सर्वसाधारण -२) | शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती |

२. उपरोक्त उमेदवारांची प्राध्यापक, शासकीय महाविद्यालये/संस्था, महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-अ या पदावर नामनिर्देशनाने, निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून नियुक्ती करण्यात येत आहे:-

१. उपरोक्त उमेदवारांची वेतनश्रेणी सातव्या वेतन आयोगानुसार रू.१,४४,२००-२,१८,२००/- (ग्रेड पे-१००००, अकॅडमिक स्तर-१४) अशी राहील. सदर वेतनश्रेणीव्यतिरिक्त शासन वेळोवेळी ठरवेल त्या दराने महागाई भत्ता, घरभाडे भत्ता व स्थानिक पूरक भत्ता अनुज्ञेय राहील.

२. उपरोक्त उमेदवारांस प्रथम वेतनवाढ परिविक्षा कालावधीतील एक वर्ष पूर्ण झाल्यानंतर देण्यात येईल व त्यानंतरची वेतनवाढ परिविक्षा कालावधी समाधानकारकरीत्या पूर्ण केल्यानंतर मिळेल.

३. उपरोक्त उमेदवारांचे परिविक्षा कालावधीतील काम किंवा वर्तणूक अयोग्य, अपेक्षित दर्जाचे अथवा अनुरुप व समाधानकारक न आढळल्यास त्यांची सेवा कोणतीही पूर्वसूचना न देता समाप्त करण्यास अथवा सेवेतून कमी करण्यास पात्र ठरतील.

४. उपरोक्त उमेदवारांची नियुक्ती सरळ सेवाप्रवेश नियुक्तीसाठी विहीत केलेल्या नियमाच्या अधीन राहून ते मराठी भाषेच्या परीक्षा उत्तीर्ण झालेले नसल्यास किंवा ती परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळालेली नसल्यास ती परीक्षा त्यांना विहीत मुदतीत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. तसे न झाल्यास त्यांची वेतनवाढ रोखून ठेवण्यात येईल.

५. उपरोक्त अ.क्र.२ येथील उमेदवाराची नियुक्ती ही चारित्र्य व पूर्वचारित्र्य पडताळणी अहवाल नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत सादर करण्याच्या अटीच्या अधीन राहून, निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात करण्यात येत आहे. त्यांच्या चारित्र्य व पूर्व चारित्र्य पडताळणीचा अहवाल असमाधानकारक असल्याचे निर्देशनास आल्यास त्यांची नियुक्ती कोणतेही कारण न देता एक महिन्याची नोटीस देऊन समाप्त करण्यात येईल.

६. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दि.७/८/२००० अन्वये शासन सेवेतील नियुक्तीकरीता संगणक हाताळणी/ वापराबाबतचे ज्ञान एक आवश्यक अर्हता म्हणून निश्चित करण्यात आली आहे. उपरोक्त उमेदवारांनी शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. प्रशिक्षण २०००/ प्र.क्र.६१/ २००१/ ३९, दि.१९/३/२००३ अन्वये आवश्यक प्रमाणपत्र नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. जर त्यांनी विहीत मुदतीत प्रमाणपत्र उपलब्ध करुन दिले नाही तर उक्त कालावधी संपताच त्यांची सदर पदावरील सेवा कोणतीही पूर्वसूचना न देता समाप्त करण्यात येतील.

७. उपरोक्त उमेदवारांचे वेतन महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ मधील तरतुदीनुसार निश्चित करण्यात येईल.

८. सदर उमेदवारांनी नियुक्तीच्या पदावर आदेशाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत तात्काळ रुजू व्हावे व याबाबतचा अहवाल संबंधित महाविद्यालय/संस्थेच्या प्राचार्य/संचालक यांनी संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांच्यामार्फत शासनास सादर करावा. प्रस्तुत नियुक्तीच्या संदर्भात सदर उमेदवारांनी वरील मुदतीत काहीही कळविले नाही तर कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांच्या नियुक्तीचे सदरचे आदेश रद्द करण्यात येतील.

९. उपरोक्त उमेदवारानी नोकरी सोडण्यापूर्वी शासनास एक महिन्याची पूर्वसूचना देणे अथवा एक महिन्याचे वेतन देणे आवश्यक आहे.

१०. शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. अंनियो-१००९/प्र.क्र.३२/सेवा-४, दिनांक १८.०८.२००९ मधील तरतुदींनुसार दिनांक ०१ नोव्हेंबर, २००५ पूर्वी शासन सेवेत निवृत्तीवेतनार्ह आस्थापनेवर कार्यरत असलेल्या शासकीय कर्मचाऱ्याने त्याच किंवा अन्य विभागातील निवृत्तीवेतनार्ह आस्थापनेच्या पदावरील नियुक्तीसाठी दिनांक ०१ नोव्हेंबर, २००५ पूर्वी किंवा त्यानंतर अर्ज केला असेल तर अशा प्रकरणी शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. अंनियो-१००६/८७/सेवा-४, दिनांक १२ जानेवारी, २००७ मधील (१) ते (iv) येथे नमूद केलेल्या सर्व अटींची पूर्तता झाल्यास संबंधित कर्मचाऱ्यास महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू ठरतील. दिनांक १८.०८.२००९ रोजीच्या परिपत्रकात (i) ते (iv) येथील नमूद सर्व अटींची पूर्तता ज्या प्रकरणी होत नसेल, अशा शासकीय कर्मचाऱ्यास नवीन राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू ठरेल.

११. उमेदवाराचे प्रचलित नियमानुसार सेवानिवृत्तीचे वय शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१५/प्र.क्र. ४८४/१५/विशि-१, दि.१२.०७.२०१६ मधील विहित अटींच्या अधीन राहून ६० वर्षे राहील.

१२. उपरोक्त उमेदवाराना नियुक्तीच्या ठिकाणी उपस्थित राहण्यासाठी प्रवासभत्ता देण्यात येणार नाही.

१३. वर नमूद केलेल्या अटी व शर्ती व्यतिरिक्त महाराष्ट्र शासनाच्या अधिका-यांना लागू असलेले प्रचलित नागरी सेवा विषयक सर्वसाधारण नियम सदर उमेदवारांना लागू राहतील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६१०१४१२०२४२३४०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ASHOK SHANKAR MANDE

Digitally signed by ASHOK SHANKAR MANDE
DN: c=IN, 2.5.4.97=OFN:GOVERNMENT OF MAHARASHTRA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HTED, 2.5.4.20=FABB29D28CDBCBE5C9EED052CB38B8CB567068A0090E237F095C6E50A52A6CF5, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=D96FF33E8AF31F745D84F3411F94D896382FAA82659B10108672887A87D6FC7C, cn=ASHOK SHANKAR MANDE
Date: 2026.10.14 12:03:41 +05'30'

**(अशोक मांडे)**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत.**

१. मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
४. सह सचिव/उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
५. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई.
७. प्राचार्य/संचालक, सर्व शासकीय महाविद्यालय/संस्था.
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा)-महाराष्ट्र-१, मुंबई.
९. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
१०. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
११. श्रीम. दिपाली पुंडलिकराव गुलवाडे, गुरूकृपा, प्लॉट नं. २०, न्यु स्वस्तिक नगर, बडनेरा रोड, अमरावती- ४४४ ६०५.
१२. श्री. उमेश उत्तमराव जाधव, फ्लॅट नं.४०४, रॉयल मॅजेस्टीक, सि. नं. २९/१/१, शिवराज नगर, रहाटणी, रॉयल रहाडकी जवळ, ता. हवेली, जि. पुणे- ४११ ०१७.
१३. श्री. अनिकेतकुमार कृष्णराव गादे, सुरभी लेआऊट, सोमनाथ अपार्टमेंट जवळ, तपोवन परिसर, अमरावती- ४४४ ६०२.
१४. श्री. विश्वंभर सुकलाल पाटील, प्लॅट न.-६०१, बसाव ज्योती हाईट्स, को फोर्ज समोर, हनुमान नगर, उजळाईवाडी, कोल्हापूर- ४१६ ००४.
१५. श्री. प्रविण सोपानराव वाळके, फ्लॅट नं. ७, ई- विंग, टिचर्स कॉर्टर्स, कलिना कॅम्पस, युनिवर्सिटी ऑफ मुंबई, मुंबई- ४०० ०९८.

१६.श्री. मनोज माधवानंद लेखक, फ्लॅट न. ३०४, एच.आर.- २, स्टार आशियाना, जवळ कोल्हापूर पब्लिक स्कुल, राजेंद्र नगर, कोल्हापूर- ४१६ ००४.

१७.श्रीम. प्रज्ञाशैली भगवान सवाई, फ्लॅट नं. ०१, प्लॉट नं. १३८, सोमनाथ कॉम्प्लेक्स, बसैये नगर, अॅपेक्स हॉस्पिटल जवळ, छ. संभाजीनगर.

१८.श्री. जगदिश छबुराव सोनवणे, c/o विष्णुकुमार खंडेलवाल, गोपालकुंज, स्वामी समर्थ मंदिराजवळ, गुलमोहर रोड, सावेडी, अहिल्यानगर- ४१४ ००३.

१९.श्री. राजु मदन बेलेकर, साई अपार्टमेंट, २९, पार्वती नगर, रामेश्वरी चौक, नागपूर- ४४० ०२७.

२०.श्री. सावळीराम गोगा घाणे, आर.एस.१/२, प्लॉट नं.- २, सोनाई रेसिडेन्सी, भैरवनाथ मंदिराजवळ, मोरेवाडी, ता. करवीर, कोल्हापूर- ४१६ ०१३.

२१.श्री. चरणसिंग नथ्थुसिंग कायटे, फ्लॅट नं. ६०१, ए 4, फ्लेमिंगो हाऊसिंग सोसायटी, एमआयडीसी, चिखलठाना, छ. संभाजीनगर- ४३१ ००७.

२२.श्रीम. शोभा कमलाकर बावीस्कर, प्लॉट नं. ०९, प्रगती कॉलनी, मकाई गेट रोड, छ. संभाजीनगर, महाराष्ट्र- ४३१ ००१.

२३.श्रीम. वंदना मोहनराव कांबळे, १२०२, ७-अ, दत्तकृपा म्हाडा, ओल्ड एम. एच. बी. कॉलनी, बोरीवली (प), मुंबई- ४०० ०९१.

२४. श्री. तुकाराम गोविंद ठाणगे, मु. पो. वासुंदे, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर, पिन- ४१४ ३०४.

२५. निवडनस्ती (मशि-१).